# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ४ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


### जम्मू-काश्मीरच्या बांदीपोरामध्ये भीषण अपघात!

## लष्कराचा ट्रक दरीत कोसळला २ जवान शहीद, अनेक जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४जम्मू काश्मीर** उत्तर काश्मीरमधील बांदीपोरा भागात एक मोठी दुर्घटना घडली आहे. येथे शनिवारी ०४ जानेवारी रोजी भारतीय लष्कराचे एक वाहन दरीत कोसळले, यामध्ये दोन सैनिक ठार झाले. या अपघातात तीन जवान जखमी झाल्याचे वृत्त आहे, जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जम्मू-काश्मीर पोलीस आणि सुनाचे अनेक जवान घटनास्थळी बचाव कार्यात करत आहेत.

उत्तर काश्मीर जिल्ह्यातील एसके पायनजवळ लष्कराचे एक वाहन रस्त्यावरून घसरले आणि दरीत कोसळले. या अपघातात दहशतवादी अँगल असल्याचा कोणताही पुरावा अद्याप मिळालेला नाही. मात्र, सध्या पोलीस आणि लष्कराच्या जवानांकडून बचावकार्य सुरू असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे



प्रयत्न सुरू आहेत.

याआधीही २४ डिसेंबर २०२४ रोजी जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील बलनोई सेक्टरमध्ये मोठा रस्ता अपघात झाला होता. या अपघातात लष्कराचे वाहन ३०० फूट खोल दरीत कोसळले. पूंछ सेक्टरमध्ये ऑपरेशनल ड्युटी दरम्यान हा अपघात झाला. या अपघातात पाच जवान शहीद झाले.

## तीन आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.४बीड** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींना कोर्टाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सरपंच देशमुख यांची हत्या करून सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे हे आरोपी फरार झाले होते. तर आरोपींना संतोष देशमुख यांच्याविषयी माहिती देणारा सिद्धार्थ सोनवणे हादेखील फरार होता. या तीनही आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवारी रात्री उशिरा

### बीड हत्या प्रकरण

अटक केली. आरोपींना आज कोर्टात हजर केल्यानंतर दोन्ही बाजूच्या वकिलांचा युक्तिवाद झाला आणि त्यानंतर कोर्टाने तीनही आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सरकारी वकिलांनी आज बाजू मांडताना म्हटलं की, या आरोपींकडून दहशत माजवून खंडणी मागितली जात असल्याने



या भागात नवीन उद्योग येत नाहीत. तसंच संघटितपणे आरोपींकडून गुन्हेगारी सुरू आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी आरोपींना पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी विनंती सरकारी वकिलांकडून करण्यात आली. ही विनंती मान्य करत कोर्टाने आरोपींना १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे.

**आरोपींना पुण्यातून अटक**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात यापूर्वी चार आरोपींना अटक करण्यात आली होती. आरोपी विष्णू चाटे, जयराम चाटे, प्रतीक घुले आणि महेश केदार यांचा समावेश होता. तर आरोपी सुदर्शन चंद्रभान घुले , कृष्णा शामराव आंधळे, सुधीर ज्ञानोबा सांगळे हे फरार होते. या आरोपींना पकडण्यासाठी प्रसिद्धीपत्रक जारी करत फरार घोषित करण्यात आलं होतं. त्यानंतर आता सुदर्शन घुले, सुधीर सांगळे यांना अटक करण्यात आली आहे. तर कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. दोन्ही आरोपींना पुण्यातून अटक करण्यात आली आहे.

## गलती से मिस्टेक! जळगावात वीजबिलांवर मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरेंचाच फोटो!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४जळगाव-** महावितरणनं जानेवारीत वितरीत केलेल्या वीजबिलांवर अजूनही मुख्यमंत्री म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो आहे. महाराष्ट्रात महायुतीचं सरकार आलं. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. तरीही अजून, वीजबिलांवर मुख्यमंत्री म्हणून मान मात्र उद्धव ठाकरे यांना देण्यात आल्याचं दिसत आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असून, मक्तेदाराला नोटीस बजावण्यात आली आहे.महावितरणनं जानेवारीत वितरित केलेल्या



वीजबिलांवर, अजूनही मुख्यमंत्री म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो आहे. विधानसभेत महायुती सरकारनं बाजी मारली. सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस विराजमान झाले. पण वीजबिलावर मात्र मुख्यमंत्री म्हणून मान मात्र उद्धव ठाकरे यांना आल्याचं चित्र आहे.

दरम्यान, महावितरणकडून दर महिन्याला वीजबिलाच्या प्रिंटची स्टेशनरी मक्तेदाराला पुरवण्यात येते.

## वक्फ बोर्ड असू शकते तर सनातन बोर्ड का होऊ शकत नाही? देवकीनंदन ठाकूर यांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४बंगळुरू:** बंगळुरू मधील एका मंदिर संमेलनाच्या उद्घाटन समारंभात कथावाचक देवकीनंदन ठाकूर यांनी मोठे विधान केले आहे. जर वक्फ बोर्ड असू शकते तर सनातन बोर्ड का होऊ शकत नाही? असा सवाल देवकीनंदन ठाकूर यांनी करत मंदिरे सरकारच्या नियंत्रणातून मुक्त करण्यासाठी आणि सनातन बोर्डाची स्थापना करण्यासाठी पुन्हा एकदा आवाज उठवला आहे.

मंदिरे सरकारच्या नियंत्रणातून मुक्त करण्याच्या मागणीवर जोर देत देवकीनंदन



ठाकूर म्हणाले की, तिरुपती बालाजी मंदिरातून राज्य सरकारला दरवर्षी ५०० कोटी रुपये दिले जातात, मात्र ही रक्कम धर्म परिवर्तन आणि प्रसादात भेसळ करण्यासाठी वापरली जात होती.याचबरोबर, सनातन बोर्डाची स्थापना झाली नाही, तर सरकारे बदलली की मंदिरांचे संवर्धन करणे कठीण होईल, ज्याप्रकारे आज संभलमध्ये स्थिती आहे, तशी स्थितीही परत येऊ शकते. मंदिरांच्या रक्षणासाठी हिंदूंना हारांसह भाले उचलावे लागतील आणि कोणत्याही परिस्थितीत देशातील शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखाली सनातन बोर्डाची स्थापना करावी लागेल, असे देवकीनंदन ठाकूर म्हणाले.

### देवकीनंदन ठाकूर यांनी बोलावली होती धर्म संसद

नोव्हेंबर २०२५ मध्ये कथाकार देवकीनंदन ठाकूर यांनी सनातन धर्म संसद बोलावली होती. या धर्म संसदेत सहभागी होण्यासाठी मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, जेपी नड्डा, अखिलेश यादव अशा अनेक बड्या नेत्यांनाही निमंत्रणे पाठवण्यात आली होती. तसेच, देवकीनंदन ठाकूर सनातन बोर्ड स्थापन करण्याची मागणी करत होते. या धर्म संसदेत वक्फ बोर्डाच्या धर्तीवर सनातन बोर्ड स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय, लव्ह जिहाद-गोहत्या आणि कृष्णजन्मभूमी हा सुद्धा या धर्म संसदेचा अजेंडा होता.

## दिल्ली निवडणुकीसाठी भाजपची पहिली यादी जाहीर

## अरविंद केजरीवालांना आव्हान देणार प्रवेश वर्मा!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ नवी दिल्ली :**दिल्लीत विधानसभा निवडणुका होणार आहेत. दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची पहिली यादी जाहीर झाली आहे. या यादीत भाजपने २९ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत.

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात भाजपने प्रवेश साहिब सिंह वर्मा यांना तिकीट दिले आहे. तर दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांच्या विरोधात रमेश



बिधुरी यांना मैदानात उतरवण्यात आले आहे. भाजपने आदर्श नगर मतदारसंघातून राजकुमार भाटिया, बदलीमधून दीपक चौधरी, रिठालामधून कुलवंत राणा, नांगलोई जाटमधून मनोज शौकीन, मंगोलपुरीमधून राजकुमार चौहान, रोहिणीमधून विजेंद्र गुप्ता, शालीमार बागमधून रेखा गुप्ता, मॉडल टाउनमधून अशोक गोयल, करोल बागमधून दुष्यंत कुमार गौतम, पटेल नगरमधून राजकुमार आनंद, राजौरी गार्डन येथून सरदार मनजिंदर सिंग सिरसा, जनकपुरीमधून आशिष सूद यांना तिकिट दिले आहे.

याचबरोबर, नवी दिल्लीतून प्रवेश साहिब सिंग वर्मा, जंगपुरामधून सरदार तरविंदर सिंग, मालवीय नगरमधून सतीश उपाध्याय, आरके पुरममधून अनिल शर्मा, मेहरौलीमधून गजेंद्र यादव, छतरपूरमधून कर्तारसिंग तंवर, आंबेडकर नगरमधून खुशीराम चुनार, कालकाजीमधून रमेश बिधुरी, बदरपूरमधून नारायण दत्त शर्मा, पटपरगंजमधून रवींद्र सिंग नेगी, विश्वास नगरमधून ओम प्रकाश वर्मा, कृष्णा नगरमधून अनिल गोयल, गांधीनगरमधून अरविंदर सिंग लवली, सीमापुरीतून कुमारी रिंकू, रोहतास नगरमधून जितेंद्र महाजन आणि घोंडामधून अजय महावर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

### पहिल्या यादीत दोन महिलांना तिकीट

भाजपने २९ जागांसाठी ज्या उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत, त्यापैकी दोन महिला आहेत. रेखा गुप्ता यांना शालीमार बागमधून उमेदवारी देण्यात आली असून सीमापुरी अनुसूचित जाती मतदारसंघातून कुमारी रिंकू यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

## संतोष देशमुख प्रकरणातील दोन आरोपी ताब्यात

### मनोज जरांगे म्हणाले, सगळ्यांची नार्को टेस्ट करा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४परभणी**

जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात आरोपींपैकी फरार असलेल्या दोघांना २५ दिवसांनी अटक करण्यात आली आहे. मात्र अजूनही एक आरोपी फरार असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस तिसऱ्या फरार आरोपीचा कसून शोध घेत आहेत. सीआयडी पथक आणि एसआयटीद्वारे करण्यात येत असलेल्या संयुक्त तपासाद्वारे दोघांनाही ताब्यात घेण्यात आलं आहे. यानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटत आहेत.



### सगळ्या आरोपींची नार्को टेस्ट करा

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक झाल्यानंतर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. आता एक काम सरकारकडून होणे गरजेचे आहे. या सगळ्या आरोपींची नार्को टेस्ट केली पाहिजे. खंडणीच्या आणि हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी दोघांची नार्को टेस्ट झाली पाहिजे.

सरकारने यात अजिबात हयगय करु नये. कारण यामध्ये मोठे रॅकेट आहे. पुण्यातून सगळ्यांना पकडले जात आहे, याचा अर्थ सरकार आणि सरकारमधील मंत्र्यांचे प्रचंड राजकीय पाठबळ आहे.

यांना कोण सांभाळत आहे, त्यांना सुद्धा सरकारने अटक करावी, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली.

### सरकारने यांना पाठिशी घालू नये

देशमुख यांची क्रूर पद्धतीने हत्या झाली. आरोपीला संभाळण्यात यांना मोठेपणा वाटतो. हे कोण आहेत? आरोपीने कोणाच्या तरी लेकाचा, लेकीच्या बापाचा खून केला. तुम्ही त्यांना सांभाळत आहात, सरकारने यांना पाठिशी घालू नये. हे रॅकेटच आहे. हा डावच आहे. सरकारमधील मंत्री याला खतपाणी घालत आहेत. इतके दिवस लपून राहतात. सामूहिक कट शिजत आहे. सरकारमधले मंत्री-आमदार यांना शिकवतात. बीडचे नाव बदनाम केले, आता पुण्याच नाव खराब करत आहेत, अशी टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली.


## काय सांगता? भरदिवसा शुक्राच्या चांदणीचे दर्शन!

### अवकाशप्रेमींसाठी अनोखी पर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अकोला :** रात्रीच्या आकाशात नेहमी ग्रह तारकांचा नजारा अनुभवता येतो. भरदिवसा आकाश मध्याशी चंद्रकोरी जवळ जरा वरच्या बाजूला सुमारे ४ अंश अंतरावर शुक्राच्या चांदणीचे दर्शन शुक्रवारी दुपारी अकोला शहरात घडले. या प्रकारे शनिवारी दुपारी २ वाजतानंतर देखील भरदिवसा शुक्राच्या चांदणीचा अनुभव घेता येईल, अशी माहिती विश्वभारती केंद्राचे संचालक प्रभाकर दोड यांनी दिली. ही अतिदुर्मीळ घटना अवकाश प्रेमींसाठी अनोखी पर्वणी ठरणार आहे.

सूर्य, चंद्र आणि पृथ्वी यांच्यातील अंतरे सापेक्ष दृष्टीने कमी अधिक होतात. मनोहारी व आकर्षक आकाश नजाऱ्याचा आनंद घेता येतो. शुक्रवारी दुपारी आकाश मध्याशी चंद्रकोरीजवळ शुक्राच्या चांदणीचे दर्शन झाले. हा दुर्लभ आनंद शनिवारीदेखील घेता येणार आहे. प्रारंभी आकाश मध्यावर व नंतर पश्चिम आकाशात नुसत्या डोळ्यांनी पाहता येईल. उंच इमारती किंवा उंच व दाट झाडांच्या सावलीतून हा अनोखा



आकाश नजारा पाहणे सोईचे ठरणार आहे. आधी चंद्र बघून नंतर जरा पुढील भागात शुक्र भरदुपारी २ वाजताच्या सुमारास पाहता येईल, असे प्रभाकर दोड म्हणाले.

### आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्राचेही दर्शन

७ जानेवारीला उत्तर आकाशात उदय होणारे सात ताऱ्यांचे सप्तर्षी अधिक रंगत आणतील. सोबतच आकाशात फिरणाऱ्या स्टार लिंक्स आणि याच वेळी दक्षिण आकाशात ७.२७ ते ७.२९ या कालावधीत आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्रसुद्धा बघता येणार आहे.

## संपादकीय ......

# चला, कामावर हजर व्हा! फडणवीसांचा मंत्र्यांना इशारा

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये महायुतीला 'न भूतो, न भविष्यते' यश मिळाले. १९५२ सालापासून महाराष्ट्र राज्यामध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये इतके भरघोस यश कोणत्याही पक्षाला स्वबळावर अथवा आघाडी तसेच युतीलाही मिळाले नव्हते. या निवडणुकीमध्ये विरोधकांचा दारूण पराभव झाला. लोकसभा निवडणुकीमध्ये मिळालेल्या यशामुळे महाविकास आघाडीला अगदी आकाशही ठेंगणे झाले होते. २८८ आमदारांच्या सभागृहात महायुतीने २३० संख्याबळापर्यंत मजल मारल्याने दुसऱ्या अथवा तिसऱ्या दिवशीच सरकार बनवणे महाराष्ट्रीय जनतेला अपेक्षित होते. मुख्यमंत्री निवडीच्या घोळातच सुरुवातीला काही दिवसांचा वेळ गेला. निर्विवादपणे बहुमत मिळाले असतानाही मुख्यमंत्री पदाची शपथ बनविण्यास तसेच सरकार बनविण्यास अगोदरच महायुतीला विलंब झाला होता. सरकार आले, मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असा महाराष्ट्र राज्याचा कारभार काही दिवस चालविण्यात आला. मंत्रिमंडळातील खात्यावरूनही रुसवे-फुगवे काढण्यातच देवेंद्र फडणवीसांचा वेळ गेला. मंत्रिमंडळ विस्तारास विलंब झाला तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र स्वस्थ बसले नव्हते. त्यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यापासून राज्याचा कारभार कागदावर नाही, तर जनतेत उतरून करण्यास सुरुवात केली होती.

एकीकडे खातेवाटपावरून मित्रांचे रुसवे-फुगवे काढताना दुसरीकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका, विकासकामांच्या योजना यावर मुख्यमंत्री फडणवीसांचे काम सुरूच होते. त्यात मंत्रिमंडळ विस्तार झाला तरी अपेक्षित खाती न मिळाल्याने नाराजीचे धुमारे उमसतच होते. त्यातून कारभार स्वीकारण्यास विलंब होत गेला. यातून काही मंत्री आपल्याला अपेक्षित खाती न मिळाल्याने नाराजी दाखविण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे महाराष्ट्रीय जनतेमध्ये महायुती सरकारबाबत वेगळा संदेश जात असल्याचा व यातून महायुती सरकारची वेगळीच प्रतिमा जनसामान्यांमध्ये निर्माण होत असल्याचा धोका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळीच ओळखला. एक-दोन दिवसांमध्ये मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारा, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना द्यावा लागला. एकीकडे राजकीय रुसवा-फुगवीमुळे मंत्रिमंडळ विस्तार, शपथविधी, खातेवाटप, मंत्र्यांना करण्यात आलेले दालन आणि बंगल्याचे वाटप याबाबतही जनतेमध्ये कुजबुज सुरू झाली होती. मात्र महायुती सरकारमध्ये असलेल्या शिवसेनेच्या अनेक मंत्र्यांना बंगले न मिळाल्यामुळे त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. त्यांना बंगले हवे असताना राहण्यास साधा फ्लॅट देण्यात आला आहे. आम्ही फ्लॅटमध्ये का राहायचे? आम्हाला राहण्यास बंगले हवे होते. महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाच्या मंत्र्यांना बंगले देण्यात आलेले असताना मात्र आम्हाला फ्लॅट दिले आहेत, असे म्हणत शिवसेनेच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

। कारणामुळेच शिवसेनेच्या काही मंत्र्यांनी मंत्रीपदाचा पदभार स्वीकारला नसल्याची चर्चा आहे, तर काही मंत्र्यांना मनासारखे खाते न मिळाल्यामुळे, मनासारखे दालन आणि बंगला न मिळाल्यामुळे त्यांनी अद्यापपर्यंत मंत्रीपदाचा पदभार स्वीकारला नसल्याची राजकीय वर्तुळात तसेच सर्वसामान्यांमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली आहे. मुख्यमंत्र्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव आहे. राज्यात कोणती अनपेक्षित घटना घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास महाविकास आघाडी त्याचे भांडवल करून जनसामान्यांची सहानुभूती मिळविण्याचा धोका आहे. त्यात कल्याण, मुंबई, बीड, राजगुरुनगरमध्ये घडलेल्या घटनांनी महाराष्ट्राचे राजकीय व सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. बीडच्या घटनेने तर राज्यातील मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरून सरकारकडे संशयाने पाहिले जात आहे. बीड व सभोवतालच्या भागात मोर्चे निघाले आहेत, निदर्शने करण्यात आली आहेत. मोठा आका, छोटा आका हे शब्द आता महाराष्ट्रीय जनतेलाही परिचयाचे झाले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांना १०० दिवसांचा रोड मॅप तयार करायचा आहे. या १०० दिवसांत प्रत्येक खात्याचा संबंधित मंत्र्याकडून १०० दिवसांचा आढावा मुख्यमंत्री घेणार आहेत. म्हणून या कृती आराखड्यासाठी आपण लवकरच कामाला लागले पाहिजे. यामुळे मंत्रीपदाचा पदभार न स्वीकारलेल्या मंत्र्यांनी लवकरच पदभार स्वीकारून कामाला लागावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

पदभार स्वीकारण्याचा इशारा त्यांनी दिलाच आहे, या इशाऱ्याचे गांभीर्य न ओळखणाऱ्या मंत्र्यांचे पद काढून घेण्यासही देवेंद्र फडणवीस मागे-पुढे पाहणार नाहीत. त्यामुळे इशाऱ्याचे गांभीर्य ओळखून मंत्री कारभार हाती घेतील व फडणवीसांना अपेक्षित असलेला कारभार करतील अशी अपेक्षा भाजपाच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. एसटीचे प्रकरण काढून देवेंद्र फडणवीस यांनी एकाच बाणातून अनेक निशाणे लावल्याने मित्रपक्षांतील सहकाऱ्यांना सूचित व गर्भित इशारा दिला आहे. आमदार मोठ्या संख्येने निवडून आल्याने व मंत्रिमंडळाची सदस्य संख्या ४३ पर्यंतच सीमित असल्याने अनेक मातब्बरांना मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही. अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून छगन भुजबळांना, भाजपाकडून सुधीर मनगुंटीवारांना तसेच शिवसेनेकडून केसरकरांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने अनेक प्रस्थापितांकडून नाराजीचा सूरही आळविण्यात आला आहे. आपल्या आमदारांची समजूत काढताना महायुतीमधील नेतेमंडळींना तारेवरची कसरत करावी लागली आहे. भुजबळांचे नाराजीपर्व महाराष्ट्राने जवळून पाहिले आहे. त्यातच शिवसेनेतील आमदारांची नाराजी शमविण्यासाठी एकनाथ शिंदे यांना अडीच वर्षांच्या फॉर्म्यूल्यावरही विचार करावा लागला आहे. मंत्रिमंडळामध्ये स्थान मिळालेले आमदार मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे सोडून महत्त्वाचे खाते मिळाले नाही, केबिन मिळाले नाही, बंगला मिळाला नाही म्हणून पदभार स्वीकारण्यास विलंब करून आपली नाराजी व्यक्त करण्याचा प्रकार मुळातच चुकीचा आहे. ते कार्यभार स्वीकारण्यास विलंब करून महाराष्ट्रीय जनतेच्या अपेक्षापूर्तींना विलंब करत आहेत. त्यांच्या रुसव्या-फुगव्याहून, नाराजीहून महाराष्ट्र हित महत्त्वाचे असल्याने मुख्यमंत्री फडणवीसांना अखेरीस भात्यातील ब्रह्मास्त्र काढावे लागले आहे.




## बॅडमिंटन खेळा, तंदुरुस्त राहा



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

भारतीयांचे जेवण लाल-तिखटाशिवाय होणे तसे कठीणचं ! कोणतीही भाजी किंवा विशिष्ट पक्कान बनवताना आपण तिखटाचा वापर करतोच. त्याऐवजी झणझणीत भाजी तयार होणे अशक्य असे म्हणणे चुकिचे ठरणार नाही. या लाल तिखटामध्ये लाल मिरचीचा वापर केला जातो. ज्यामुळे पदार्थाला विशिष्ट चवही येते आणि रंगही येतो. हल्ली तर लाल मिरचीचे टॉपिंग पिझ्झा-पास्तावर टाकून खाण्यात येते. पण, ही झणझणीत लाल मिरची जास्त प्रमाणात खाणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. डॉक्टरही, जास्त तिखट खावू नये असा सल्ला देतात कारण लाल मिरचीच्या सेवनाने आरोग्याशी संबधित अनेक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे निरोगी आरोग्यासाठी लाल मिरची प्रमाणात खाणेच योग्य समजले जाते. असे असले तर लाल मिरची जास्त प्रमाणात खाणे कसे महागात पडू शकते पाहूयात,

**पोटावर परिणामकारक** -लाल मिरचीमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात, ज्यात कॅप्साइन नावाचा पदार्थही आढळतो. या पदार्थाच्या सेवनाने पोटामुळे जळजळ जाणवते आणि आतडंयानाही त्रास जाणवतो. परिणामी, तुम्हाला वारंवार अपचन, गॅस, पोटदूखी जाणवते. लाल मिरची तिखट असते, त्यामुळे तिखट पदार्थ खाल्याने पोटात अल्सर होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे जास्त तिखट पदार्थ खाणे टाळा.

लाल मिरचीच्या सेवनाने तोंड, डोळे आणि शरीराच्या आतील भागात जळजळ जाणवू शकते. तसेच जास्त तिखट खाल्याने डोळ्यांना त्रास होऊ शकतो, डोळ्यांतून पाणी येवू शकते. ज्यामुळे डोळ्यांच्या विविध समस्या जाणवू शकतात.

**मानसिक आरोग्यावर होतो परिणाम** - लाल मिरची खूप जास्त प्रमाणात खाल्ल्याने मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. तुम्हाला ताण, तणावाच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते.

**उष्णता वाढते** -लाल मिरचीच्या अतिसेवनाने शरीरातील उष्णता वाढू शकते कारण लाल मिरची निसर्गत: उष्ण असते.

एॅलर्जी -अनेकांना कोणत्यातरी गोष्टीची एॅलर्जी असते, तुम्हाला जर तिखटाची एॅलर्जी असेल तर तुम्ही लाल मिरचीचे सेवन टाळायला हवे. अशा परिस्थितीत, जर एॅलर्जी असेल आणि लाल मिरची तुम्ही खाल्लीत तर त्वचेवर खाज येणे, रॅशेस अशा समस्या जाणवू शकतात.

# गहू, हरभरा पिकाच्या उत्पादनात घट टाळण्यासाठी हे कराच

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

हरभरा व गहू पिके सध्या मुख्य वाढीच्या अवस्थेत असून पिकांना आवश्यक असलेली थंडी पडत असली तरी अधूनमधून ढगाळ हवामानामुळे रोग आणि किडींचा प्रादुर्भावहोण्याचीही



विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शक्यता आहे. हरभरा व गहू पिकावरील रोग आणि किडींचे नियंत्रण न केल्यास पीक उत्पादनात (ऊीझीर्वीलींळेप) ४० टक्क्यापर्यंत घट येण्याची शक्यता असते.

**गहू पिकाची काळजी**

गव्हावरील तांबेरा रोगाची लागण दिसून येताच मॅंकोझेब/झायनेब ७५ डब्ल्यूपी बुरशीनाशकाची ३० ग्रॅ. दहा लिटर पाण्यातून किंवा प्रोपीकोनाझोल २५ % इसी १० मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

गरजेनुसार दुसरी फवारणी १५ दिवसांनी करावी.

गहू पिकावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड + मॅन्कोझेब प्रत्येकी २० ग्रॅ. १० लिटर पाण्यातून फवारावे.

**दुसरी फवारणी १५ दिवसांनी करावी.**

गहू पिकावरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी थायोमेथोक्झाम २५ डब्ल्यूजी, १ ग्रॅ. किंवा सिटामीप्रिड २० एसपी, ५ ग्रॅ. १० लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.

**हरभरा पिकाची काळजी**

हरभऱ्यावरील मर रोग हा पिकास जास्त पाणी दिल्याने तसेच जमिनीत जास्त दिवस जास्त प्रमाणात ओल राहिल्याने किंवा पेरणीच्या वेळी बियाणावर बीजप्रक्रिया न केल्याने होतो.

यासाठी पिकास योग्य प्रमाणात पाणी द्यावे, तसेच पेरणीपूर्वी बियाणावर आवर्जून बीजप्रक्रिया करावी.

हरभऱ्यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी फुलकळी येऊ लागताच ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी.

दुसरी फवारणी १० ते १५ दिवसांच्या अंतराने हेलिओकिल या विषाणूजन्य जैविक कीटकनाशकाची ५०० मि.ली. ५०० लिटर पाण्यातून फवारणी करावी. गरजेनुसार तिसरी फवारणी इमामेक्टीन बेंझोएट ५% एसजी, ४ ग्रॅ. १० लिटर पाण्यातून करावी.


**- डॉ. कल्याण देवळाणकर**, सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ

# नऊ महिन्यात जिल्ह्यात वीजचोरीची बाराशे प्रकरणे उघडकीस

## २०२५ मध्ये वीज चोर महावितरणच्या रडारवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,**एप्रिल ते डिसेंबर २०२४ या नऊ महिन्यात महावितरणकडून १ हजार १८४ वीजचोरांवर कारवाई करण्यात आली आहे. कारवाईअंती या ग्राहकांनी ४ कोटी २८ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे आढळून आले आहे. या सर्वांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, तडजोड शुल्क भरून वीज चोरीची रक्कम न भरणाऱ्या वीज चोरीच्या प्रकरणात कायदेशिर कारवाईला सुरूवात करण्यात आली असल्याची माहिती अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी दिली आहे. वीजचोरी पकडण्यासाठी महावितरण सातत्याने वीजचोरीविरोधात मोहीम राबविते. महावितरण कडून जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या मोहिमेदरम्यान एप्रिल-२०२४ ते डिसेंबर -२०२४ या नऊ महिन्यांत उघडकीस आणलेल्या वीज चोरीच्या प्रकरणामध्ये मीटर मध्ये छेडछाड करणे ,मीटर बंद पाडणे,मीटर दुरून बंद करण्यासाठी रिमोटचा वापर करणे,मीटरच्या मागच्या बाजूने छीद्र पाडत मीटरमध्ये रोध निर्माण करून मीटर बंद पाडणे किंवा मीटरची गती संथ करणे असे अफलातून प्रकार उघडकीस आले आहे. या सर्व ग्राहकांना ४ कोटी २८ लाख रुपयाची वीजचोरीची बिले देण्यात आली होती. त्यापैकी १ हजार ५० वीज चोरी प्रकरणात तडजोड शुल्कासह ४ कोटी २१



लाखाची वीजबिले भरण्यात आली आहेत.परंतू अजूनही पैसे भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या १३४ प्रकरणात कायदेशिर करवाई करण्याची प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. संचालक(संचालन) अरविंद भादीकर यांनी नुकताच अमरावती येथे घेतलेल्या बैठकित वीज चोराविरूध्द होत असलेल्या कारवाईत नाराजी व्यक्त करत मोहिम तीव्र करून वितरण हानी १५%पर्यंत कमी करण्याचे उध्दीष्ट दिले आहेत.आगामी काळात जिल्ह्यात महावितरणकडून अधिक तीव्रपणे मोहिम राबविण्यात येणार आहे आणि या मोहित फॉल्टी मीटर,सरासरी वीज बिल असणाऱ्या सर्वच ग्राहकांची तपासणी करण्याला सुरूवात करण्यात आली आहे.तसेच सवलत देऊनही अभय योजनेत कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेले सुमारे ७० हजार ग्राहक सहभागी झालेले नाहीत व त्यांनी पुनर्जोडणी घेतलेली नाही. त्यामुळे कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या सर्वच ग्राहकाची प्रत्यक्ष तपासणीला सुरूवात करण्यात आली आहे. वीज चोरीच्या अनधिकृत विद्युतभारा मुळे विद्युत वाहकावर, रोहित्रावर

### फॉल्टी मीटर, सरासरी वीज बिल, कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकाची होणार तपासणी

त्याच्या मर्यादेच्या पलीकडे भार पडतो, परिणामी रोहित्रात बिघाड होतो.शॉर्ट सर्किट होऊन वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडतात. त्याचा नाहक त्रास नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांवर होतो व महावितरणलाही त्याचा मोठा आर्थीक फटका होतो.याशिवाय वीज पुरवठा खंडित झाल्यावर महावितरणला ग्राहकाच्या रोषाला सामोरे जावे लागते.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया१९७ शाळांची नोंदणी, आज शेवटचा दिवस

## ४२ शाळांची अद्यापही नोंदणी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अमरावती-** आरटीई प्रवेशप्रक्रियेत शाळा नोंदणीच्या पहिल्या टप्प्यात आतापर्यंत २३९ शाळांपैकी १९७ शाळांची नोंदणी आटोपली आहे. परंतु शनिवारी शाळा नोंदणीचा शेवटचा दिवस असताना अद्यापही ४२ शाळांची नोंदणी शिल्लक आहे. एका दिवसांत ४२ शाळांची नोंदणी होईल का, की या प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ मिळेल याकडे लक्ष लागले आहे.

आरटीईच्या सन २०२५-२६ शैक्षणिक सत्राकरिता प्रवेशप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात शाळा नोंदणी प्रक्रिया राबविली जात असून १८ ते ३१ डिसेंबरपर्यंत

शाळा नोंदणीचा कार्यक्रम शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आला होता. ३१ डिसेंबरपर्यंत शेवटच्या दिवशी केवळ १४८ शाळांनी नोंदणी झाल्याने या प्रक्रियेला मुदतवाढ



देण्याची मागणी होत होती. अखेर ३१ डिसेंबरला शाळा नोंदणी प्रक्रियेला ४ जानेवारीपर्यंत मुदतवाढीचे आदेश धडकले. ३ जानेवारीपर्यंत २३९ पैकी १९७ शाळाची नोंदणी आटोपली होती. यामध्ये १४३ शाळांची पडताळणी आटोपली असुन ५४ शाळांची पडताळणी सुरू आहे. नोंदणी झालेल्याशाळांमध्ये सर्वाधिक शाळा ह्या अमरावती शहरातील ६३ शाळा आहेत. त्यापाठोपाठ अचलपुर १६, अमरावतीग्रामिण २६, अंजनगावसुर्जी २१, भातकुली ८, चांदूर रेल्वे ५, चिखलदरा १, चांदूरबाजार १७, दर्यापुर १७, धामणगावरेल्वे ११, धारणी ३, मोर्शी १७, नांदगावखंडेश्वर ६, तिवसा१० व वरूड तालुक्यातील १८ शाळांचा समावेश आहे. शाळा नोंदण शनिवारी शेवटचा दिवस असताना अद्यापही ४२ शाळांची नोंदणी ि आहे. त्यामुळे एका दिवसांत या शाळांची नोंदणी अशक्य असल्याने मुदतवाढीची शक्यता वर्तविली जात आहे.

# आता पीक विमा योजनेत घोळ होणार नाही, काय म्हणाले केंद्रीय कृषिमंत्री?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४नवी दिल्ली-** केंद्र सरकारच्या माध्यमातून यावर कठोर पाऊले उचलण्यात येत आहेत. आता पीक विमा योजनेत घोळ होणार नाही कारण यात तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. ज्याद्वारे नुकसान झालेल्या शेताचाच सर्वे होऊन नुकसान भरपाई दिली जाणार असल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिली. ते आज नाशिक दौऱ्यावर होते.

पीक विमा योजनेत घोळ होत असल्याच्या तक्रारी राज्यभरातून समोर येत आहेत. नाशिक जिल्ह्यातून देखील काही बोगस शेतकऱ्यांच्या नावावर पीक विमा काढल्याचे निदर्शनास आले आहे. आत्तापर्यंत पिक विमा योजनेत देशभरातून १४ कोटी अर्ज आले असून एक लाख ७० हजार कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. मात्र तरीदेखील या योजनेबाबत काही तक्रारी समोर आल्या आहेत.

यात ज्या शेतकऱ्यांचे खरोखर नुकसान झाले आहे, ते शेतकरी वंचित राहिले आहेत आणि ज्या शेतकऱ्यांचे नुकसान नाही झाले. अशा शेतकऱ्यांना देखील लाभ झाल्याचं सांगितलं जात आहे.

या पार्श्वभूमीवर सरकार नव्या तंत्रज्ञानाचा वापर या योजनेसाठी करणार असल्याचं केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग




यांनी सांगितलं. जवळपास साडेआठशे कोटीहून अधिक रुपयांचा हा प्रकल्प असून सॅटेलाईटच्या माध्यमातून रिमोट सेन्सिंगच्याद्वारे नुकसान झालेल्या ठिकाणाचे फोटो घेतले जातात.

**आता चूक होणार नाही...**

यानंतर संबंधित नुकसानीचे फोटो आणि माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात येईल आणि यानंतर शेतकऱ्यांचा पिक विमा भरला जाईल आणि त्यानंतर ती नुकसान भरपाई थेट शेतकऱ्यांच्या डीबीटी खात्यात जमा करण्यात येईल. अशा पद्धतीने यात कोणतीही मानवी चूक होणार नाही, शिवाय जाणून बुजून कोणतीही गडबड होणार नाही, असे सूतोवाच केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चव्हाण यांनी दिले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ४ जानेवारी २०२५

शहर/ग्रामिण


# बच्चू कडूंकडून दिव्यांग मंत्रालयाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

## दिव्यांग आणि शेतकरी प्रश्नावरून आता सरकारविरोधात संघर्ष करण्याची भूमिका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मुंबई**

प्रहारचे नेते आणि राज्याचे माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियानाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. या पदावर राहून मला दिव्यांगांना न्याय देईल असं वाटत नाही, दिव्यांगांना न्याय देण्यासाठी आता आंदोलन करावे लागणार असल्याचं सांगत बच्चू कडू यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीत कडू यांनी राजीनामा सोपवला आहे.

बच्चू कडू यांनी म्हटलं आहे की, भारतातले पहिले दिव्यांग मंत्रालय महाराष्ट्रात निर्माण केल्याबद्दल एकनाथ शिंदे यांचे मनापासून आभार. परंतु अद्यापपर्यंत दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयाचे काम सुरू झाले नाही. पदावर राहून हे काम होणार, अशी शक्यता मला मावळता दिसत आहे. दिव्यांगासोबत बेईमानी मला शक्य नाही. त्यामुळे मी माझा दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान, अध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे. तो मंजूर करुन सहकार्य करावे, तसेच मला असलेली सुरक्षाही काढून टाकावी व कुठलीही सुरक्षा देण्यात येऊ नये, अशी मागणी बच्चू कडू यांनी केली आहे.

दरम्यान, बच्चू कडू यांचा यंदाच्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाला असून त्यांनी दिव्यांग आणि शेतकरी प्रश्नावरून आता सरकारविरोधात संघर्ष करण्याची भूमिका निश्चित केल्याचे दिसत आहे.

### बच्चू कडू यांच्या पत्रात कोणते मुद्दे?

दिव्यांगांबाबत राज्य सरकारकडून अपेक्षित पावलं टाकण्यात येत नसल्याचं सांगत बच्चू कडू यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. दिव्यांग मंत्रालय निर्माण झाले परंतु, १. इतर राज्यांपेक्षा दिव्यांगांना महाराष्ट्रामध्ये मिळणारे मानधन सर्वांत कमी आहे. २. मिळणारे मानधन वेळेवर कधीच मिळत नाही. ३. स्थानिक स्वराज्य संस्था ५ टक्के निधी खर्च करत नाही. ४. अजूनही स्वतंत्र मंत्री नाही आणि सचिव पण नाही. ५. जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र कार्यालय नाही आणि पद भरती नाही. ६. इतर अनेक गोष्टी ज्या झाल्या नाहीत आणि या पदावर राहून ते होणार अशी शक्यता मावळली आहे. म्हणून दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी मला आंदोलने करावी लागणार असून पदावर राहून आंदोलन करणे शक्य नाही, दिव्यांगासोबत बेईमानी कदापि शक्य नाही. म्हणून मी माझा राजीनामा देत आहे. तो मंजूर करून सहकार्य करावे, तसेच मला असलेली सुरक्षा काढून टाकावी आणि कुठलीही सुरक्षा ठेवण्यात येऊ नये, अशी भूमिका बच्चू कडू यांनी मांडली आहे.

# पिंपळखुटा गावात एकाचवेळी उलट्या आणि हगवणचे आठ रुग्ण आढळले

## वैद्यकीय सतर्कतेचा इशारा, गावात तात्पूर्ती ओपीडी सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील अंजनसिंगी आरोग्य केंद्रांतर्गत पिंपळखुटा गावात आज (दि. ३) सकाळी अचानकपणे गावातील विविध भागातील उलट्या व हगवणने त्रस्त आठ जण आरोग्य केंद्रात दाखल झाल्याने आरोग्य विभाग खळबळून जागे झाले. तालुका आरोग्य अधिकारी यांनी तात्काळ तपासणी केली व पिंपळखुटा गावात ग्रामपंचायतशेजारी तात्पुरती ओपीडी सुरू केली आणि वैद्यकीय तपासणी केली जात आहे.

अंजनसिंगी आरोग्य केंद्रात ओकाऱ्या व हगवण आजाराने त्रस्त रूग्ण तपासणीसाठी सकाळी आले होते. यात वेदांत प्रमोद गावंडे (वय ८), ज्ञानेश्वरी प्रमोद गावंडे (वय १०), शिला ओंकार गायके (वय ६०), शोभा अशोक गायके (वय ६५), मोरेश्वर उत्तम गायके (वय ५८), आशा भोयर (वय ६८), जानरावजी शेलोकार (वय ५५), प्रतीक्षा गायके (वय १९), अक्षांत निशांत जांभूळकर वय २) यांचा समावेश होता. यारुग्णांपैकी ५ रुग्ण केवळ औषधे देऊन बरे झाले, तर ३ रुग्णांना सलाईन लावून चांगले ठेवण्यात आले.रुग्णाचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

आरोग्यविभागाच्या वतीने तालुका आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर, डॉ. मेघा वानखेडे, डॉ. धीरज देशमुख, डॉ. मयूर, पर्यवेक्षक चांदणे, मीना चौहान हे परिस्थितीवर नियंत्रण ठेऊन आहेत.

### परिस्थिती नियंत्रणात– डॉ. विवेक सुदेवाल

पिंपळखुटा गावातील वेगवेगळ्या भागातून एकाचवेळी ८ रुग्ण आल्याचे गंभीर असल्याचे सांगून इतर रुग्णांकडून कोणतीही तक्रार नसल्यामुळे परिस्थिती नियंत्रणात असल्याचे डॉ. विवेक सुदेवाल यांनी सांगितले. पिण्याचे पाणी गरम करून प्यावे, उलट्या किंवा जुलाब झाल्यास प्रथमोपचारासाठी ओआरएस घ्यावे, असा सल्ला त्यांनी दिला.–

# चांदूररेल्वेत १०० रुपयांच्या बनावट नोटा घेऊन फिरणाऱ्याला अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अमरावती–** शहरात १०० रुपयांच्या बनावट नोटा घेऊन फिरणाऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेने २ जानेवारीला केली. न्यायालयाने आरोपीला ९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. अंकुश गुलाबराव सोनकुवर (वय २४, रा. सांगुलवाडा, ता. चांदूररेल्वे) असे आरोपीचे नाव आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मोहम्मद तस्लीम शेख गफुर हे २ जानेवारीला रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान चांदूररेल्वे शहरातील आठवडी बाजार येथे पेट्रोलिंग करीत असताना गोपीनय माहिती मिळाली की, एक इसम भारतीय चलना सारख्या दिसणाऱ्या १०० च्या बनावट नोटा खऱ्या नोटा म्हणुन बाजारात घेऊन फिरत आहे.

आरोपीची विचारपुस व अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ हुबेहुबे दिसणाऱ्या १०० च्या सात नोटा मिळून आल्या. त्यामुळे या नोटा व मोबाइल किंमत अंदाजे १० हजार रूपये असा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला. याप्रकरणी चांदूररेल्वे पोलिसांत आरोपी अंकुश गुलाबराव सोनकुवर (२४ वर्ष, रा. सांगुलवाडा, ता. चांदूररेल्वे) याच्याविरूध्द बीएनएस कलम १७९, १८० अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. त्याला शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास चांदूररेल्वेचे ठाणेदार आकरे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय सुयोग महापुरे करीत आहे.

# झेडपीचा आदर्श कर्मचारी पुरस्कार सोहळा थाटात

## जिपमधील ३० आदर्श कर्मचाऱ्यांचा सन्मान



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्याने शुक्रवारी विमलाबाई देशमुख सहभागृहात आदर्श कर्मचारी पुरस्कार सोहळा थाटात पार पडला. यावेळी रक्तदान शिबिरांसह परिसवांद आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी ३० कर्मचाऱ्यांना सीईओ संजिता महापात्र यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

उत्कृष्ट काम करणाऱ्या झेडपी कर्मचार्याचाही सन्मान व्हावा याकरीता त्यांना जिल्हास्तरावर आदर्श कर्मचारी पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे सीईओंच्या अध्यक्षतेखाली कर्मचाऱ्यांची निवड करण्याकरीता सात सदस्यीस समितीचे गठण करण्यात आले होते. या समितीव्दारे ३० कर्मचाऱ्यांची निवड करीत त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला गुरुवारी क्रांतिज्योजी सावित्रीबाई फुले यांच्या जयतींनिमित्य आयोजित कार्यक्रामध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्राच्या सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जंयती निमित प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. त्यानंतर महिला मुक्तीदिन आणि स्त्री शिक्षण या विषयांवर महिला अधिकारी कर्मचारी आणि विदयार्थीनी विचार मांडले. कर्मचाऱ्यांनी रक्तदान शिबीराचे देखील आयोजन करण्यात आले होते.याशिवाय आरोग्य तपासणी, आरोग्य विषयक समस्या व मार्गदर्शन, सायबर सुरक्षा आणि संभाव्य धोके यावर सहा.पो.नि. अनिकेत कासारकर यांनी मागदर्शन केले. ताणतणाव व्यवस्थापनावर मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांचेशी उपस्थितांचा संवाद व चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर ३० कर्मचाऱ्यांना आदर्श पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर, अतिरिक्त सीईओ प्रिती देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस, बांधकामचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, वित्त व मुख्यलेखाधिकारी आश्विणी मारणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी सुनिल जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी सुरेश आसोले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय खारकर आदींची उपस्थिती होती.

### यांना मिळाला पुरस्कार....

अर्पणी आत्राम, सुजित गावंडे, वैनिषा घुबडे, दिनेश बैगणे, विलास देशमुख, सुरेखा उके, मोहीत तिडके, विलास पकडे, अनिरूध्द काळे, रमजान शाह सिकंदर शाह, शेख इब्राहीम शेख यासिम, रिजवान सादुल्ला खान, सालेहा शिरीन समि उल्लाह खान, नारायन माहूलकर, अमर ठाकरे, संजय येऊतकर, रूपेश देशमुख, रेखा हुरबंडे, रोशन गोरडे, फारूख शेख अब्दूल जलील, गजेंद्र पाटील, रविद्र बेठेकर, राजु रामसिग झाकर्डे, गजेंद्र काळे, अमोल उभाड, विजयेंद्र दिवान यांचा समावेश आहे.

# आमदार रवी राणांची महापालिकेत सहा तास आढावा बैठक





*विदर्भ प्रजासत्ताक*

*दि.४अमरावती –* *मनपातील काही अधिकाऱ्यांच्या मनात सर्वसामान्यांबद्दल पाझरच फुटत नाही, म्हणून शहरात समस्या आहेत. आता मनपा आयुक्तांनी जबाबदारी निश्चित करून नागरिकांच्या समस्या त्वरित निकाली काढाव्यात. शहरातील कामे गतिमान व दर्जेदार करावीत, शहर सौंदर्यीकरणाला महत्त्व द्यावे, अशी सूचना नव्याने आमदार झाल्यानंतर प्रथमच शुक्रवारी दु. १२.३० वाजता मनपातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात घेतलेल्या बैठकीत आ. रवी राणा यांनी केली. ही बैठक ६ तास चालली.*

*भुयारी गटार योजनेबाबत नेहमीच मजीप्रा व मनपातील अधिकारी चालढकल करतात. मनपा आयुक्तांनी जबाबदारी निश्चित करावी, असे सांगितल्यानंतर मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी भुयारी गटात व इतर गटारांबाबत कोणतीही समस्या असली तर वैद्यकीय स्वच्छता अधिकारी डॉ. अजय जाधव तिचे समाधान करतील, अशी ग्वाही दिली. एकाच कंत्राटदाराने १०–१० कामे घेतली तर त्या कामांना त्यांना न्याय देता येणार नाही. झेपत नसेल तर त्यांनी कामे घेऊ नये, बोगस कामे आढळली तर गय करणार नाही, असे खडे बोलही कंत्राटदारांना आ. राणा यांनी सुनावले. सोबतच शासनाच्या पैशाचा दुरुपयोग होत असेल तर मी स्वत: कंत्राटदारा विरोधात गुन्हा दाखल करेल. तसेच जे अधिकारी कंत्राटदारांना पाठीशी घालत असतील त्यांच्यावर कारवाई करा, अशी सूचनाही आ. राणा यांनी मनपा आयुक्तांना केली. शहरातील स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे. त्यामुळे स्वच्छता कंत्राटां च्या अटी व शर्ती नव्याने तयार करा, असे आमदारांनी सांगितल्य ानंतर आठ दिवसांत मनपा स्वच्छतेबाबत नवे धोरण जाहीर करेल, असे आयुक्तांनी सांगितले. त्याचवेळी असे झाले नाही तर आंदोलन करू, असा इशाराही आमदारांनी दिला. फिशरिज हबच्या रखडलेल्या कामाबाबत विचारणा केली असता १२ घटकांचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. २१.८२ कोटीपैकी आतापर्यंत १८ कोटी रुपये खर्च झाले. केवळ कोल्ड स्टोरेजची काही तांत्रिक कामे आणि विद्युत जोडण्या व्हायच्या आहेत. तसेच सक्षम एजन्सी नियुक्त करायची आहे, असे मनपा पशुशल्य चिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे यांनी सांगितल्यानंतर ८ दिवसांत बैठक लावण्याचे निर्देश आमदारांनी दिले.या बैठकीत अमरावती मनपा क्षेत्रातील नवीन टॅक्स वसुलीला स्थगिती आल्यावरही जुन्या दराने टॅक्स वसुली संदर्भात नागरिकांत असलेला संभ्रम दूर करण्यासाठी जुन्या दराने टॅक्स घेऊन नागरिकांना टॅक्स कसा लागला याची सविस्तर माहिती देण्यात यावी. मनपाचे मालमत्ता कर हे प्रमुख उत्पन्न असले तरी नागरिकांवर भुर्दंड पडणार नाही याची काळजी घ्यावी. अवाजवी मालमत्ता कर लावू नये, अशी सूचना आमदारांनी केली. केंद्र शासनाकडून ५० इलेक्ट्रिक बस मिळणार असून, इलेक्ट्रिक बस शेड निर्मितीसाठी*

### भुयारी गटार योजनेबाबत राणांचा आक्रमक पावित्रा

*जागेचा प्रयत्न त्वरित निकाली काढण्याचे निर्देश आमदारांनी दिले. विकासात्मक कामे पूर्ण करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असून, मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. महापालिकेने तांत्रिक अडचणी सोडवून काम करणे अपेक्षित आहे. मनपाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून विकास कामासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन आमदारांनी दिले.*

# विकासासाठी महिलांना प्रोत्साहन देण्यात यावे - जिल्हाधिकारी सौरभ कटियार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती,**

महिलांमध्ये विकासाची मोठी क्षमता आहे. त्या कोणतेही काम करण्यास सक्षम आहेत. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी महिलांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

मेळघाट हाट येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महिला व बालविकास उपायुक्त विलास मरसाळे, आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी डॉ. उमेश टेकाळे, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सुनिल सोसे, प्रमुख वक्त्या क्षिप्रा मानकर, आहारतज्ज्ञ दिपाली भैसे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, संपूर्ण समाज मुलींच्या शिक्षणाच्या विरोधात असताना सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिकविले. महिलांच्या सशक्तीकरणाच्या दृष्टीने शिक्षण महत्वाचे ठरले आहे. महिलांच्या शिक्षणामुळे आज सर्व क्षेत्रात महिलांचा पुढाकार आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी माविम चांगले कार्य करीत आहे. नुकत्याच झालेल्या महालक्ष्मी सरसमध्ये जिल्ह्याला दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. बचतगटांना मेळघाट हाटच्या माध्यमातून पॅकेजिंग, ब्रँडींगची सुविधा दिल्यामुळे विविध संकेतस्थळावरून या वस्तूंची विक्री होणार आहे. महिलांवर टाकलेला विश्वासाने केलेले कार्य सार्थ ठरविले आहे.

श्रीमती महापात्र यांनी, महिलांनी एकमेकींना प्रोत्साहित आणि पाठींबा देण्याची गरज आहे. सुदैवाने राज्यातील महिला सक्षम आहेत. महिलांनी वस्तू उत्पादीत करताना त्यांच्या पॅकेजिंगवरही लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. महिलांमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांना केवळ प्रोत्साहनाची गरज आहे. पर्यटन विभागाने १५ लाख कर्ज देणारी आई योजना जाहिर केली अहो. याचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

प्रमुख वक्त्या क्षीप्रा मानकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील विविध प्रसंगावर प्रकाश टाकला. पतीच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी महिला शिक्षणाचे कार्य नेटाने पार पाडले. तसेच केशवपनाविरूद्ध न्हाव्यांचे मतपरिवर्तन करून त्यांचा सहभाग करून घेतला. त्यासोबतच त्यांनी साथीच्या काळात अमुल्य योगदान दिले. महिलांनी त्यांचा वैचारिक वारसा जपावा, असे आवाहन केले.

यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या रांगोळीभोवतील १९४ दिवे प्रज्वलीत करण्यात आले. याठिकाणी सकस आहार स्पर्धा घेण्यात आली. तसेच पिंक ई-रिक्षाचे सादरीकरण करण्यात आले.

यावेळी सकस आहार स्पर्धेतील प्रथम अरूणा वंजारी, द्वितीय विणा जामनिक, आणि तृतीय गौतमी म्हैसकर यांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट व्यवसाय करणाऱ्या सरिता किल्लेदार, कृष्णमूर्ती ढेरे, भाग्यश्री खरकाटे, निलिमा बोबडे, अर्चना बोबडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रविणनगर येथील सिदरा महिला बचतगटाला सहा लाख रूपयांचा धनादेश देण्यात आला. एकता अल्पसंख्याक लोकसंचालित साधन केंद्राच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

# २४,२५,२६ जानेवारी रोजी अमरावती आमदार सांस्कृतिक महोत्सव-२०२५ चे तीन दिवसीय आयोजन

## स्वर-शोध, सामूहिक नृत्य स्पर्धा, पुष्प प्रदर्शनी व महिला बचतगट मेळावा व रंगारंग कार्यक्रमांची मेजवानी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ४ अमरावती-**
विदर्भाची सांस्कृतिक नगरी म्हणून अमरावतीचा नावलौकिक आहे. या कला, क्रीडा ,सांस्कृतिक वैभवाचे नेहमीच जतन करून प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठान च्या वतीने नेहमीच अमरावतीकरांना विविध कला-क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांची बहारदार मेजवानी दिली आहे. स्थानिक कलाकारांच्या कलाविष्कारांनी नटलेला तसेच विविध प्रजातींच्या पुष्प प्रदर्शनाने बहरलेला सांस्कृतिक महोत्सव आता नव्या रंगात ,नव्या जोशात व जल्लोषात अमरावतीकरांच्या भेटीला येत आहे.

प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठानच्या वतीने येत्या २४, २५,व २६ जानेवारी २०२५ रोजी तीन दिवसीय अमरावती आमदार सांस्कृतिक महोत्सव-२०२५ चे भव्य आयोजन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन मोर्शी रोड अमरावती. येथे करण्यात आले आहे. या तीन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवा अंतर्गत भव्य पुष्पप्रदर्शनी व स्पर्धा ,



महिला बचत गट मेळावा, सामुहिक नृत्य स्पर्धा व स्वर-शोध मराठी-हिंदी खुली सिनेगीत गायन स्पर्धा असे रंगारंग कार्यक्रम होणार आहे. या आयोजनाला घेऊन दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी सांस्कृतिक भवन येथे बैठक पार पडली असून यामध्ये कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून आयोजना संदर्भात माहिती देण्यात आली. सांस्कृतिक महोत्सवाचे मुख्य आकर्षण असलेल्या भव्य पुष्प सजावट-प्रदर्शनी व स्पर्धा चे मुख्य यजमान अमरावती गार्डन क्लब असून पुष्पप्रेमींना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करावी लागणार आहे. तर सिद्धी विनायक महिला बचत गट महासंघा द्वारे आयोजित महिला बचत गट मेळावामध्ये महिला बचत गटांना विविध उत्पादनाचे स्टॉल लावायचे असल्याने त्यांना श्री. सिद्धीविनायक महिला बचत गट सहकारी पतसंस्था मनपा व्यापारी संकुल राजापेठ येथे संपर्क करून नाव नोंदणी करावी लागणार आहे. तसेच सामुहिक नृत्य स्पर्धा व स्वर-शोध हिंदी - मराठी खुली सिने गीत स्पर्धा गट -अ व गट ब मध्ये सहभागी होण्याकरीता लवकरच ऑडिशन घेण्यात येणार असून आरसीएन डिजिटल कार्यालय तिसरा माळा मनपा व्यापारी संकुल राजापेठ येथे हि निवड फेरी घेण्यात येईल. तसेच स्पर्धकांना प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस देऊन भव्य समारंभात सुप्रसिद्ध सिने अभिनेत्रींच्या मुख्य उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार आहे. समूह नृत्य स्पर्धा व स्वरशोध सिनेगीत स्पर्धेकरीता संपूर्ण राज्यभरातून प्रवेशिका मागविण्या त येणार आहे. या संदर्भातील अधिक माहिती सुद्धा सर्वांना कळविण्यात येणार आहे. त्यामुळे बाहेर गावातील कलावंतां ना निवड फेरी मध्ये गुगल फार्म भरून सहभागी होता येईल , करिता समुह नृत्यस्पर्धेसाठी व स्वर शोध गीत गायन स्पर्धेसाठी दिलेल्या लिंक वर ऑडिशन चे व्हिडीओ अपलोड करण्याचे आहे.

# संघाचे आता कुटुंब प्रबोधनावर लक्ष

## आगामी काळात कुटुंब संघाच्या कार्याशी जोडणे, त्यांचे प्रबोधन करणे हा उद्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नागपूर :**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनेक स्वयंसेवक काही वर्षांपासून संघाच्या संपर्कात नसलेल्या कुटुंबांशी संपर्क प्रस्थापित करीत आहेत. त्याचाच भाग म्हणून ४, ५ जानेवारीला मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर येथे कुटुंब प्रबोधनासाठी अखिल भारतीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीत ४६ प्रांतांतील कुटुंब प्रबोधन उपक्रमाचे प्रांतीय समन्वयक व सहसंयोजक पत्नीसह ओंकारेश्वर येथे एकत्र येणार आहेत. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत या बैठकीला मार्गदर्शन करतील. कुटुंब प्रबोधन उपक्रमाचे अखिल भारतीय समन्वयक डॉ. रवींद्र शंकर जोशी यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. कुटुंब प्रबोधन उपक्रम २००८ मध्ये सुरू झाला. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत झालेल्या श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या अक्षता (निमंत्रण) वाटपासाठी देशातील बहुतांश घरांशी संघाचा पुन्हा संपर्क आला. यामध्ये अनेक नवी कुटुंबे संघाशी जोडली गेली.

या बैठकीत 'कुटुंबप्रणाली सक्षम करा' या विषयावर संवाद व कुतूहल संकल्पना आयोजित करण्यात आली आहे. भौगोलिक रचनेनुसार अकरा गटप्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. कौटुंबिक मित्रांच्या माध्यमातून ४६ प्रांत आणि ९०० जिल्ह्यांमध्ये संघ कार्याचा विस्तार करण्याची योजना आहे. कुटुंबात राष्ट्रीय दृष्टी आणि सामाजिक मूल्ये जागृत करून परस्पर प्रेम, आदर निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो, अशी माहिती आयोजकांनी दिली.

> कौटुंबिक प्रबोधन हा उपक्रम २००८ पासून सुरू झाला असला तरी संघात पाच वर्षांपूर्वी या विषयावर कामास खरी सुरुवात झाली. अयोध्येतील राम मंदिरासाठी जानेवारी २०२१ मध्ये सुरू झालेल्या निधी संकलन अभियानाच्या माध्यमातून संघ स्वयंसेवकांनी परिचयाबाहेरील कुटुंबांशी संपर्क प्रस्थापित केला.
> – **रवींद्र जोशी**, समन्वयक, कुटुंब प्रबोधन उपक्रम

# कापड कारखान्यामधून दहा बालकामगारांची केली सुटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-**
शहरातील एमआयडीसी भागात असलेल्या एका कापड निर्मिती कारखान्यावर आयुक्तालयाच्या विशेष पथकाचे प्रमुख पीआय आसाराम चोरमले व बाल कामगार प्रतिबंध अधिकाऱ्यांनी धाड टाकली. त्यावेळी या कापड कारखान्यात कामासाठी १० बाल कामगार होते. पोलिसांनी त्यांची सुटका केली. ते दहाही मुले पश्चिम बंगालमधील असल्याचे समोर आले. ही कारवाई ई २ २ जानेवारीला केली. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी कारखाना मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सुदर्शन तिर्थदास मतानी (७९, रा. द्वारकानाथ कॉलनी, अमरावती) असे पोलिसांनी गुन्हा दाखल केलेल्या कारखानदाराचे नाव आहे. मतानी यांचा एमआयडीसी परिसरात फ्रॉक तयार करण्याचा कारखाना आहे. या कारखान्यात मूळचे पश्चिम बंगाल येथील काही बालक कामगार म्हणून कार्यरत असल्याची माहिती आयुक्तालयाच्या विशेष पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे विशेष पथकाचे प्रमुख पीआय चोरमले तथा दुकाने निरीक्षकश्रेणी २ तथा बाल व किशोरवयीन कामगार प्रतिबंध अधिकारी संजय पांडे यांनी संयुक्तपणे मतानींच्या कारखान्यात धाड टाकली. त्यावेळी कार्यरत मनुष्यबळापैकी १० बाल कामगार असल्याचे समोर आले. मागील वर्षभरापासून ते अमरावतीत काम करत आहेत. या कारखान्यात काम करायचे आणि कारखान्याच्या मागील बाजूला रात्रीच्या वेळी मुक्काम करायचा, असा त्यांचा नित्यक्रम आहे.

### बालकांना कामावर ठेवल्याने कारखाना मालकाविरुद्ध गुन्हा

बालकामगारांना कामावर ठेवून त्यांच्याकडून काम करून घेणे हा कायदेशीर गुन्हा आहे. त्यामुळे बाल व किशोरवयीन कामगार प्रतिबंध अधिकारी संजय पांडे यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी सुदर्शन मतानींवरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या बाल कामगारांची सुटका करून त्यांना बाल सुरक्षा गृहात ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.-

दरम्यान बालकामगार फ्रॉकला विविध मटेरियल लावण्यासह इतर शिलाईसंबंधी काम करत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# शासनाने राष्ट्रीय महामार्गावरील निंभी, पुसला येथील टोल नाक्याची भूमिका स्पष्ट करावी !

## खासगी वाहने टोल मुक्त न केल्यास जनआंदोलन ऊभारण्याचा ईशारा !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मोर्शी** नांदगावपेठ मोर्शी वरूड पांढूर्णा राष्ट्रीय महामार्गाचे काम नीकृष्ट दर्जाचे व अपूर्ण असतांनाही वरूड मोर्शी अमरावती राष्ट्रीय महामार्गावर मोर्शी वरूड तालुक्यात निंभी येथील टोल नाका सुरू केला असून पुसला येथील टोल नाका सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून हजारो नागरिकांचे बळी घेऊन त्यांचे संसार उध्वस्त करणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या अपूर्ण अवस्थेत असलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील नींभी, पुसला येथील टोल नाका खासगी चार चाकी वाहनांना टोल मुक्त करण्याबाबत शासनाने आपली भुमिका स्पष्ट करून मोर्शी वरूड तालुक्यातील दोन्ही टोल नाके टोल मुक्त न केल्यास मोर्शी वरूड तालुक्यात जन आंदोलन उभारण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत रुपेश वाळके यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाला दिला आहे.नांदगावपेठ मोर्शी वरूड पांढूर्णा राष्ट्रीय




महामार्गावरून हजारो नागरिक रोज मोठ्या संख्येने अमरावती - पांढूर्णा ये-जा करीत असतांना नांदगावपेठ येथील टोल नाक्यावर ८ किलोमिटर करीता शेकडो रुपये टोल वसुल करून मोर्शी वरूड तालुक्यातील नागरिकांना भुर्दंड सोसावा लागत असतांना आता पुन्हा नींभी, पुसला येथे टोल नाका सुरू करून वाहन धारकांची लूट होणार असल्यामुळे निंभी, पुसला येथील टोल नाका खासगी चार चाकी वाहनांसाठी व शेतकऱ्यांच्या शेतमाल वाहून नेणाऱ्या वाहनांसाठी रद्द करण्याचा निर्णय शासनाने त्वरित घ्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने निंभी येथील टोल नाका, सुरू केल्यामुळे नागरिकांना जास्तीचा भुर्दंड सहन करावा लागत आहे नियमाप्रमाणे ७० किलो मीटरपर्यंत रस्ता व्यवस्थित असेल तरच टोल आकारता येतो. या महामार्गाचे काम पूर्ण झाले नसतांनाही जाणीवपूर्वक टोल आकारला जाणार असेल तर त्याला आमचा पूर्णपणे विरोध असल्याचे मत ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी व्यक्त केले.

# संमेलनाच्या प्रवेशद्वारास सावरकरांचे नाव!

## साहित्यप्रेमींच्या मागणीची महामंडळाकडून दखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नागपूर : -**
फेब्रुवारीमध्ये दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ, प्रवेशद्वार किंवा व्यासपीठाला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव द्यावे, अशी मागणी अनेक सावरकरप्रेमींनी साहित्य महामंडळ व आयोजकांकडे केली होती. या मागणीची अखेर दखल घेण्यात आली असून संमेलनाच्या एका प्रवेशद्वाराला सावरकरांचे नाव देण्याचा निर्णय शुक्रवारी मुंबईत झालेल्या बैठकीत एकमताने घेण्यात आला.

२१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्लीत होणाऱ्या या संमेलनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी साहित्य महामंडळ, महामंडळाच्या घटक संस्था व सरहद या आयोजक संस्थेची संयुक्त बैठक मुंबईत आयोजित करण्यात आली होती. यावेळी संमेलनात सावरकर यांचे नाव देण्याबाबत सावरकरप्रेमींनी विविध माध्यमातून आयोजक व महामंडळाकडे केलेल्या मागणीवर सर्वंकष चर्चा झाली. चर्चेअंती असे ठरले की, तालकटोरा मैदानावरील जे मुख्य प्रवेशद्वार असेल त्याला लोकमान्य टिळकांचे नाव देण्यात येईल व मैदानाच्या आत 'व्हीआयपी' प्रवेशद्वाराला स्वातंत्र्यवीर सावरकर असे नाव देण्यात येईल.

मंचावरील बैठक व्यवस्थेसाठी पर्याय

संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी महामंडळ, घटक संस्था, आयोजक संस्थांचे पदाधिकारी मिळून एकूण २८ जण मंचावर असतात. परंतु, दिल्लीतील संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान मोदी करणार असल्याने त्यांची सुरक्षा यंत्रणा इतक्या लोकांना मंचावर प्रवेशास परवानगी देणे कठीण आहे. ही बाब लक्षात घेऊन पर्यायी व्यवस्था तयार ठेवण्यात आली आहे. त्यानुसार, महामंडळाचे चार, घटक संस्थांचे तीन व आयोजक संस्थेचे तीन पदाधिकारी मंचावर असतील. याशिवाय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशीष शेलार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे प्रमुख अतिथी असतील.

### यापूर्वी भुजबळांकडून प्रस्ताव नामंजूर

नाशिक येथे पार पडलेल्या ९४ व्या साहित्य संमेलनात सावरकर यांचे चरित्र, कथा, कादंबऱ्यांचा समावेश करावा व प्रवेशद्वार अथवा व्यासपीठाला त्यांचे नाव द्यावे, अशी मागणी करण्यात आली होती. परंतु, संमेलनाचे स्वागताध्यक्ष छगन भुजबळ यांनी या संदर्भातील प्रस्ताव फेटाळून लावला होता.

# जानकीबाई देशमुख कन्या शाळेत शालेय दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अचलपूर:**
स्थानिक जानकीबाई देशमुख कन्या विद्यालयात शालेय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .अध्यक्षस्थानी अमरावती येथील रहीवासी शाळेच्या माजी विद्यार्थीनी रूपाली गोंडचोर (पोस्टल असिस्टंट) ह्या होत्या . अतिथी म्हणून प्राचार्य डॉ मीनल बोंडे (अध्यक्ष अस्मिता मंडळ अमरावती )ह्या होत्या .विशेष उपस्थिती संस्थेच्या अध्यक्षा माधुरीताई देशमुख व सचिव ड दिपकराव देशमुख यांची होती दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली .गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्राचार्य संगीता तुरखडे यांच्या मार्गदर्शनात अध्यापिका सुवर्णा देशपांडे व अमृता पाठक यांच्या संपादकत्वाखाली तयार झालेले 'उन्मेष' या हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षा रूपाली गोंडचोर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच मराठी भाषेला अभिजात दर्जा



मिळाला त्या अनुषंगाने विद्यार्थिनींनी मराठी संस्कृतीला अनुसरून मराठी सणांचे प्रात्याक्षिक सादर केले. त्यांना शारिरीक शिक्षीका देवयानी जोशी यांनी मार्गदर्शन केले. तसेच आई साहेबांच्या स्मृती प्रित्यर्थ आर्थिक स्वातंत्र्यासाठी नोकरीच आवश्यक या विषयावर आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी अध्यापिका निलीमा अमृतकर होत्या यात प्रथम पारितोषिक रीदा फातेमा द्वितीय अनन्या गणोरकर (सिटी हायस्कूल) व तृतीय क्रमांक अपूर्वा रावेकर(गुरुकुल पब्लिक स्कूल )यांनी पटकावला. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थितांनी दाद दिली .विद्यार्थिनीदवारे जुनी गाणी मराठमोळ गाणं , उठे सबके कदम, भारुड ,कठपूतली डान्स ,तारक मेहता का उलटा चष्मा , आदी कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्या संगीता तुरखडे यांनी केले .स्वागतगीत संगीत शिक्षीका पल्लवी गणोरकर व सोनाली कलोती व त्यांच्या चमूने सादर केले संचालन अनिरुद्ध गोरे यांनी केले पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक श्रीकांत पसारकर यांनी करून दिला . आभार अध्यापिका कमल बावने यांनी मानले.-

## नगर परिषदेने पाणीपट्टी थकवल्याने

# मोर्शीचा ही पाणीपुरवठा बंद होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मोर्शी-** अमरावती जिल्ह्याची तहान भागवणाऱ्या दमयंती सरोवरालगत असलेल्या मोर्शी शहराचा पाणीपुरवठा पाणीपट्टी न भरल्याने बंद होण्याची शक्यता आहे. न. प. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ मोर्शीकरांवर येऊ शकते. न. प.च्या व्यवस्थापनशून्य नियोजनामुळे पाणीपुरवठा यंत्रणेचे वीज बिल थकले आहे. परिणामी वीज वितरण कंपनीने वीजपुरवठा खंडित करून शहराचा पाणी पुरवठा ऑक्टोबर व डिसेंबर महिन्यात दोन वेळा बंद केला. या दोन्ही महिन्यात तब्बल दोन ते तीन दिवस पाणी पुरवठा - बंद होता. पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सावंत यांनी मोर्शी नगरपालिकेला पत्र पाठवले आहे. त्यामध्ये मोर्शी नगर परिषद पाणी पुरवठा योजनेच्या देयकापोटी न ७५ लाख ४ हजार ७३६ रुपयांची व रक्कम थकीत असून ही रक्कम १० म दिवसांत न भरल्यास न.प.चा पाणी पुरवठा बंद करण्याचे नमूद केले.

# तापमानामध्ये ११.१ अंशांपर्यंत घटः

## शहरासह जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** शहरासह जिल्ह्याच्या तापमानात मागील चार दिवसांपासून सातत्याने घट होत आहे. शुक्रवारी सकाळी ७.३० वाजता ११.१ अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. चार दिवसांत तापमान १८.६ वरून ११.१ अंशांपर्यंत खाली आला. नव्या वर्षात नागरिकांना थंडीचा चांगला कडाका जाणवत असून, थंडीने संपूर्ण जिल्हाच गारठला आहे. कमाल तापमानात मात्र फारश झाली नाही. ते ३२.४ अंश राहिले. आगामी तीन ते चार दिवस अशाप्रकारे थंडीचा कडाका का राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

ढगाळ वातावरण पूर्णतः निवळले असून मागील पाच दिवसांपासून उत्तरेकडून थंड वारे सतत जिल्ह्यात येत आहेत. हिमालयाच्या काही भागात बर्फवृष्टीही सुरू आहे. परिणामी जिल्ह्यात थं कडाडली असून, ग्रामीण भागात रात्री ९ पासूनच थंडी पडत आहे. शहरातही रात्री ८ नंतर रस्त्यावरील रहदारी कमी झालेली दिसत आहे. अशा थंडीतही नागरिकांची आरोग्याप्रती जागरुकता वाढली असून, धुके असले तरी ते सकाळी फिरण्यासाठी जात आहेत. काही जण सायकल चालवण्याचा आनंद घेताना दिसत आहेत. त्याचप्रमाणे शरीराला ऊर्जा मिळेल अशा खाद्य पदार्थांना मागणी वाढली आहे. डिंकाचे लाडू, मेव्याचे लाडू, केशर दूध, चहा, कॉफीला मागणी वाढली आहे.शहरातील उद्यानात नागरिक पूर्वी सारखे सकाळी ६ वाजता व्यायामाला न येता काही जण हातपाय मोकळे करत आहेत.

# श्री संत परमहंस समाधान महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कळसारोहण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ माऊली जहागीर-**
माऊली जहागीर गावात श्री संत परमहंस समाधान महाराज मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रथम दिवशी सायंकाळी भव्य अशी नगरप्रदक्षिणा गावांमधून काढण्यात आली. यामध्ये अनेक गावांमधील दिंड्या सुद्धा सहभागी झाल्या होत्या. तसेच दुसऱ्या दिवशी वैदिक मंत्रोचारच्या सोपस्काराने श्री संत = परमहंस समाधान महाराज मूर्ती - प्राणप्रतिष्ठेचा विधी वैदिक ब्राम्हण - तथा संत श्री ज्ञानेश्वर महाराज इंगळे, - श्री दास ज्ञानेश्वर अध्यात्म ज्ञानपीठ, तीर्थक्षेत्र सोनारखेड यांच्या प्रमुख - उपस्थितीत पार पडला.

गावातीलच ज्येष्ठ नागरिक तथा निवृत्त शिक्षकसदैव शैक्षणिक, सामाजिक तथा धार्मिक कार्यात अग्रेसर राहून मदतीचा हात पुढे करणारे प्रभाकर ढोमणे यांच्या पुढाकाराने तथा आर्थिक सहकायनि मंदिराचा जिर्णोद्धार, समाधान महाराज यांची संगमरवरी मूर्ती व समाधीचे काम पूर्ण करण्यात आले. तसेच श्री दास ज्ञानेश्वरअध्यात्म ज्ञानपीठ, तीर्थक्षेत्र सोनारखेड संस्थानचे वैष्णव महाराज ढोमणे यांचे गोपाळ काल्याचे कीर्तन झाले. नंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व कार्यक्रमासाठी गावातील प्रामुख्याने नंदकिशोर तायडे, सचिन वावे, रमेश टाके, नामदेव घांशिकर, विशाल खासबागे तसेच गावकऱ्यांचे सहकार्य लाभले. मंदिराच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

# ६३ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया

# ६ जानेवारीपासून निवडणुकीची प्रक्रिया सुरु होणार

## मतदार याद्यांसाठी संबंधित संस्थांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती :** जिल्ह्यात सहकार विभागांतर्गत १५१ संस्थांचा कार्यकाळ डिसेंबर महिन्यात संपुष्टात आलेला आहे. या संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाला ३१ डिसेंबरपर्यंत ब्रेक होता. त्यामुळे राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे आदेशाची प्रतीक्षा होती. तसे आदेश ३ जानेवारीला उशिरा सहकार विभागाला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे ६ जानेवारीपासून थांबलेल्या टप्प्यापासून पुढे निवडणुकीची प्रक्रिया सुरु होणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे जिल्ह्यातील १५१ सहकारी संस्थांच्या निवडणुकीला फटका बसला होता. राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणद्वारा ३१ डिसेंबरपर्यंत या संस्थांची निवडणूकआहे. त्या टप्प्यावरून पुढे ढकलण्यात आली होती.

दरम्यान, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या मार्गदर्शनात सहकार विभागाद्वारा 'ड' वर्गीय ८८ संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू केलेली आहे. यामध्ये मजूर सहकारी संस्था, बेरोजगारांच्या संस्था, पाणी वापर संस्था, औद्योगिक कामगार संस्था यासह अनेक लहान सहकारी संस्थांचा समावेश आहे.



याशिवाय पतसंस्था, सहकार सोसायटी सारख्या ३७ 'ब'वर्गीय सहकारी संस्था व १० लाखांच्या वर व्यवहार असणाऱ्या २६ 'क' वर्गीय सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रलंबित होत्या.

आता जिल्हा उपनिबंधक कार्यालयास राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे आदेश प्राप्त झाल्याने लवकरच या सर्व संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्या जाणार आहे व फेब्रुवारी महिन्यात या सर्व संस्थांमध्ये निवडणूक होण्याची शक्यता असल्याचे सहकार विभागाने सांगितले.

### मतदार याद्यांसाठी संबंधित संस्थांना पत्र

निवडणुका असलेल्या ६३ सहकारी संस्थांपैकी (ब) वर्ग ३७ संस्थांना जिल्हा उपनिबंधक व (क) वर्गीय २६ सहकारी संस्थांना संबंधित तालुक्याचे सहायक निबंधक मतदार यादी मागविण्यासाठी पत्र देणार आहे. यासाठी १ जानेवारी हा अर्हता दिनांक आहे. त्यानंतर त्या संस्थेकडून निवडणूक निधी प्राप्त झाल्यानंतर अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती सहकार विभागाने दिली.

# रेशनकार्डला मोबाइल लिंक नसल्यास धान्य पुरवठा होणार बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** शासनाच्या वतीने गरजू लाभार्थ्यांना रेशन दुकानातून स्वस्त दरात धान्य देण्यात येते. यामुळे अनेकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटण्यास मदत झाली आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे रेशन धान्य मिळावे, हक्काचे धान्य परत जाऊ नये, यासाठी रेशन कार्डला 'आधार' आणि मोबाइल नंबर लिंक केला जात आहे.

गावात कधी रेशन धान्य येणार, वाटप कधी होणार, याबाबतचे मॅसेजही लाभार्थ्यांना येत आहेत. यासाठी अनेक शिधापत्रिकाधारकांचे मोबाइल लिंक करण्यात आले आहेत. मात्र, ज्यांनी मोबाइल लिंक केले नाही. त्यांनी त्वरित करणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यानुसार, रेशनकार्ड आधारकार्ड लिंक करणे आवश्यक करण्यात आले आहे. पात्र कुटुंबांना अनुदानित दरात धान्य खरेदीचा



लाभ मिळण्यासाठी रेशनकार्ड महत्त्वाचे असते. यापूर्वी सरकारने पॅनकार्ड आणि आधारकार्ड लिंक करणे अनिवार्य केले होते.जर संबंधित रेशनकार्डधारकाने आपली ई- केवायसी पूर्ण केली नसेल, तर नवीन वर्षात त्याचा धान्यपुरवठा बंद होऊ शकतो. हे टाळण्यासाठी ग्राहकाने आपले रेशन कार्ड मोबाइलला लिंक करणे गरजेचे आहे.

### आधार, रेशनकार्ड कोणी जोडणे आवश्यक?

अंत्योदय अन्न योजनेंतर्गत लाभ घेत आहेत. त्यांच्यासाठी रेशनकार्ड आणि आधारकार्ड लिंक करणे आवश्यक आहे.

दोन्ही कार्ड लिंक केल्याने एकापेक्षा जास्त शिधापत्रिका घेण्यापासून रोखता येईल आणि गरिबांची ओळख पटवून रेशन सहज पोहोचवता येईल. जर तुम्ही वेळेत रेशनकार्ड आधारकार्डशी लिंक केले, तर तुम्हाला त्यासाठी एक रुपयाही देण्याची गरज नाही.

### घरबसल्याही लिंक करता येणार

घरातून लिंक करण्यासाठी वेबसाइट षेव्‌ु.ल.सीं.ळप वर जावे लागेल. लॉग इन केल्यानंतर तुम्हाला सर्व आवश्यक तपशील उदा. आधारकार्ड क्रमांक, शिधापत्रिका क्रमांक, नोंदणीकृत मोबाइल क्रमांक द्यावा लागेल.

# गावातल्या मालमत्तेलाही मिळणार प्रॉपर्टी कार्ड!

## भांडणतंटे मिटणार : ड्रोन छायाचित्रासह डिजिटल नकाशा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** केंद्र सरकारच्या 'स्वामित्व' योजनेंतर्गत शहरांप्रमाणेच गावांमध्येही मिळकत पत्रिका देण्यात येत आहेत. यासाठी राज्य शासनाने राज्यातील प्रत्येक गावातील गावठाणातील जमिनीची मोजणी ड्रोन प्रणालीद्वारे जीआयएस सिस्टिमने करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक गावच्या ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्तांचे प्रॉपर्टी रेकॉर्ड कार्ड तयार करण्यात येत आहे.

यासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षणाचे काम सुरू असून, जिल्ह्यात गावांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. स्वामित्व योजनेंतर्गत मालमत्ताधारकांना ऑनलाइन प्रॉपर्टी कार्ड तयार करून दिले जाणार आहे. ग्रामपंचायत हद्दीतील खरेदी केलेल्या वैयक्तिक मालमत्ता केवळ नमुना नंबर ८ला




नोंदणी करून जोडल्या जातात. या नमुना नंबर ८ वरील नोंदी केवळ ग्रामपंचायत कार्यालयात असतात. मात्र, त्याची खरेदी विक्री व मूळ मालकी हक्क याची माहिती अनेकांना नसल्याने त्यांच्याकडून प्रॉपर्टी रेकॉर्ड बनविले जात नाही, असे प्रॉपर्टी कार्ड बनविण्यासाठी आता जिल्हा भूमिअभिलेख विभागाने पंतप्रधान स्वामित्व योजनेतून गावठाण भूमापन योजनेअंतर्गत ड्रोन सर्वेक्षणाचे काम सुरू केले आहे.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग जमाबंदी आयुक्तालय व सर्व्हे ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रात अत्याधुनिक ड्रोनद्वारेगावठाण भूमापन केले जात आहे. या अंतर्गत मालमत्ताधारकांना पीआरकार्ड दिले जात आहे. यातून लाभार्थींना सनद वाटप केली जात असल्याचे भूमिअभिलेख विभागाकडून सांगण्यात आले.

### मिळकतींचा नकाशा ड्रोनने काढणार

या योजनेंतर्गत ड्रोन सव्र्व्हसाठी टप्पे पाहून प्रत्येक तालुकानिहाय गावांमध्ये ड्रोन फिरवून सर्व्हे पूर्ण केले जात आहे. एका गावामध्ये १५ मिनिटांत ड्रोनचे सर्व्हे पूर्ण होते. त्यामुळे संपूर्ण गावातील घरे मालमत्ता त्यांचे चित्र पूर्ण होते. हे चित्र संगणकावर जोडून त्या गावाचे नकाशे अद्ययावत करण्यात येत आहेत.

### भांडणं-मारामाऱ्या थांबणार

गावागावांत जागेच्या वादातून रक्ताची नाती दुरावत चालली आहेत. अनेकदा प्रकरणे पोलिस ठाण्यापर्यंत जातात. पिढ्यानपिढ्या वाद कायम राहात आहेत.

आता स्वामित्व योजनेतून भूमापन योजनेंतर्गत अगदी १० ते १५ मिनिटांत मोजणी शक्य होत आहे. त्यामुळे जमिनीचे वाद मिटण्यास मदत होणार आहे.

# वादविवादातून समाजहिताचे विचारमंथन होते- दिलीप बाबू इंगोले यांचे प्रतिपादन

## स्व.माणिकराव घवळे स्मृती वादविवाद स्पर्धेचे थाटात उदघाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती-** राज्यात मानाची समजली जाणारी स्व. माणिकराव घवळे स्मृती वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून आजवर समाजातील अनेक चिंतनशील विषयांवर तरुण पिढीने गेल्या तेवीस वर्षांपासून उत्कृष्ट विचारमंथन केले आहे. समाजाच्या हितासाठी तरुण पिढीने अश्या ज्वलंत विषयांवर मंथन करून पुढे मार्गक्रमण करणे हीच अपेक्षा आयोजकांची असावी असे मला वाटते अश्या शब्दात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेच्या आयोजनाची प्रशंसा केली. डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय व स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे थाटात उदघाटन पार पडले. यावेळी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध किडनीरोग तज्ञ डॉ. अविनाश चौधरी,प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख तसेच संयोजक प्रफुल्ल घवळे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना दिलीपबाबू इंगोले म्हणाले की, गेल्या तेवीस




वर्षातील या स्पर्धेच्या प्रवासाचा मी साक्षीदार असून यातून अनेक तरुण घडतांना मी बघितले आहे. तरुणाईचा विचार बळकट करणारी ही वैचारिक चळवळ अशीच मोठी होत राहावी अश्या शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी डॉ. अविनाश चौधरी यांनी सांगितले की, समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे व त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम ही वादविवाद स्पर्धा सातत्याने करत असून त्यातून अनेकदा आमच्यासारख्यांच्या मनातील प्रश्नांना देखील निश्चितपणे उत्तरे मिळतात. प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख यांनी स्वागतपर भाषण केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रफुल्ल घवळे यांनी केले. तसेच सूत्रसंचालन प्रा. रत्नाकर शिरसाठ व आभार मयूर चौधरी यांनी मानले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून पुणे येथील आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. पांडुरंग कंद,नागपूर येथील दै. लोकसत्ताचे सहसंपादक देवेश गोंडाने, बियाणी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. मृणाल महाजन व प्रसिद्ध साहित्यिक अमोल सावरकर यांनी काम पाहले तर संपूर्ण स्पर्धेचे अध्यक्ष म्हणून शिक्षणतज्ञ अतुल गायगोले यांनी धुरा सांभाळली. स्पर्धेत ७० स्पर्धकांनी सहभाग घेतला. राज्याच्या कोण्या कोपऱ्यातून आलेल्या स्पर्धकांनी आपल्या ओजस्वी वाणीने स्पर्धेत दमदार विचार मांडले.

### तरुणाईला सक्षम करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज - हेमंत काळमेघ

आजच्या काळात तरुणाईला योग्य दिशा देण्यासाठी तसेच त्यांच्यात विचारमंथन घडवून आणण्यासाठी अशा उपक्रमांची समाजाला गरज आहे. महाविद्यालयीन जीवनात अशाच उपक्रमांमधून पुढील जीवनात तरुणाईचे व्यक्तिमत्त्व उजळून निघते.अशा व्यासपीठातून आपले उज्वल आयुष घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना दिशा मिळते. त्यामुळे माणिकराव घवळे प्रतिष्ठानचे हे आयोजन कौतुकास्पद आहे अशा शब्दात हेमंत काळमेघ यांनी देखील कौतुकाचा वर्षाव केला.

## पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे

# श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ भव्य महापारायण सोहळ्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा जागतिक पारायण दिन, मकर संक्रांत व नवीन वर्षाच्या निमित्ताने पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे कृष्ण पक्ष चतुर्थी शुक्रवार दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी मुखोद्गत वाचक सौ. विद्याताई पडवळ (मुंबई) यांचे सुमधुर वाणीतून श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ भव्य महापारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे . महाविद्यालयाच्या स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम येथे भक्तिमय वातावरणात यावर्षी सुद्धा ५००१ भक्तगण सामूहिक परायणाचे वाचन करणार असून श्रींची महाआरती व महाप्रसादाने सांगता होणार आहे. या सोहळ्यात पारायण वाचकांना नियमित पाणी ,चहा व फराळाचे व्यवस्थापन करण्याकरिता महाविद्यालयाचे कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सहभागी होणार आहे. जेष्ठ व वयोवृद्ध व्यक्तींना वाचण्याकरिता विशेष खुर्ची ची आसन व्यवस्था या सोहळ्यात करण्यात आली तसेच मागेल





त्यांना वाचण्याकरिता श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ सुद्धा उपलब्ध करण्यात येणार आहे. या पारायण सोहळ्याच्या नोंदणी करीता ९५०३१३६७१३, ९१७५७८५१९०,९४०४८५७६८५ संपर्क करून आपले स्थान निश्चित करता येईल तसेच वाचकांनी पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या पारायण सोहळ्याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक मूल्ये आणि श्री संत गजानन महाराजांच्या शिकवणींचे महत्त्व पोहोचवणे असून श्री संत गजानन महाराजांच्या शिकवणींनी तरुण पिढीला प्रेरणा मिळावी आणि त्यांचे जीवन मूल्यांवर आधारित असावे, यासाठी हा सोहळा दरवर्षी महाविद्यालयात आयोजित करण्यात येत असून परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आता पाचवी व आठवीचा मार्ग सरळ, सोपा नाही, उत्तीर्ण होणे अनिवार्य : सरसकट पासचे धोरण रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती** - इयत्ता पाचवी आणि आठवीचे विद्यार्थी परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याला पुन्हा त्याच वर्गामध्ये बसविले जाणार आहे. सदर दोन वर्गातील नापास विद्यार्थ्यांना पुढील वर्गात ढकलले जाणार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. त्यानुसार जिल्ह्याचा शिक्षण विभाग कामात लागला असून अप्रगत विद्यार्थ्यांची माहिती केंद्र व तालुकास्तरावरून मागविली आहे.एखादा विद्यार्थी समोरच्या वर्गात जाण्यासाठीचे वेळोवेळी निश्चित करण्यात आलेले आवश्यक निकष पूर्ण करण्यास असमर्थक ठरल्यास संबंधित विद्यार्थ्यांनी आणखी अभ्यास करावा, दोन महिन्यात फेर परीक्षा घ्यावी. मात्र फेर परीक्षेतही विद्यार्थ्याला आवश्यक गुण मिळविण्यात अपयश आल्यास त्याला पाचवी किंवा आठवीच्या वर्गातच बसविण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला आहे.विद्यार्थी पुन्हा त्याच वर्गात बसल्यानंतर वर्गशिक्षकांनी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्याला मूल्यांकनाद्वारे समजून घेऊन त्याला जादा शिकवावे. प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला काढता येणार नाही, असे नव्या आदेशात नमूद केले आहे.शासकीय तसेच खासगी अनुदानित आश्रमशाळांमधील काही विद्यार्थ्यांना व्यवस्थित लिहिता व वाचता येत नाही.शहर व ग्रामीण भागातील काही विद्यार्थ्यांना गणितीय आकडेमोड, समीकरण लवकर कळत नाही, परिणामी ते यात कच्चे आहेत.पाचवी व आठवीच्या वार्षिक परीक्षेत एखादा विद्यार्थी नापास झाल्यास त्याला दुसऱ्या वर्षी त्याच वर्गात प्रवेश देण्यात येणार आहे.

# दिवसाऐवजी रात्री १२ वाजता होतोय थ्री फेज वीजपुरवठा, आश्वासन फोल

# शेतकरी म्हणतात, जगायचे की मरायचे साहेब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४तिवसा-** विधानसभा निवडणूक काळात शेतकऱ्यांना दिवसा थ्री फेज वीजपुरवठा करण्याचे गाजर दाखविण्यात आले. ते पूर्ण झाले नाही. याउलट रात्री १० वाजता थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येत असताना त्यात बदल करण्यात आला आहे. आता रात्री १२ वाजता थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांनी जगायचे की मरायचे साहेब, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.वन्यप्राण्यांचे हल्ले वाढले आहे. रानडुकराच्या कळपाने कहर केला आहे. वाघ आणि बिबट्याचे गावांचे दिशेने आगेकूच सुरू झाली आहे. शेतशिवारात वन्यप्राणी दबा धरून बसून राहत आहेत. अशातच उन्हाळी पिकांचा हंगाम सुरू झाला आहे. गहू, भुईमुंग,रब्बी पीक घेणारे शेतकऱ्यांना रात्री ला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात जावे लागत आहे. शेतकऱ्यांना ८ तास थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येत आहे.

१२ आणि २४ तास विजेचा पुरवठ्याचे स्वप्न भंगले जात आहेत. ८ तास थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येत असताना त्यातही शेतकऱ्यांचे जीवावर उठले जात आहेत. थ्री फेज वीजपुरवठा करताना आठवडाभराचा निकष लागू करण्यात येत आहे. दिवस आणि रात्रीचे निकष यात आहेत. आठवड्यातून तीन दिवसांचे निकष आहेत. लाठ्याकाठ्या घेऊन शेतकरी शेतात पंप सुरू करण्यासाठी जात होते. रात्रभर भितभित शेतात शेतकरी मुक्काम ठोकत होते. आता त्यात संताप निर्माण करणारे बदल करण्यात आले आहे.

रात्री १२ वाजता कृषी पंपधारक शेतकऱ्यांना थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येत आहे. हा बदल शेतकऱ्यांचे जिवावर उठणारा आहे. या निर्णयाचे विरोधात गावात संतापाची लाट पसरली आहे.

शेतकऱ्यांनी स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. ग्रामीण भागात जंगल तथा लांब पल्ल्याच्या ठिकाणी शेतकऱ्यांचे शेतशिवार आहेत. ये-जा करताना कसरत करावी लागत आहे. त्यातही मध्यरात्री थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येत असल्याने संताप आहे. कृषी पंपधारक शेतकऱ्यांची मोठी संख्या आहे. शेतकऱ्यांनी शेतात किती वेळा ये-जा करायचे. असा सवाल उपस्थित करण्यात येत आहेत.रात्री कृषीपंप सुरू केल्यानंतर पुन्हा काही क्षणासाठी विजेचा पुरवठा बंद झाल्यास पुन्हा त्याच क्षणी शेतात विजेचा पुरवठा सुरू करण्यासाठी जावे लागत आहे. शेतात साप विंचवाची भीतीही तितकीच राहत आहे. यापेक्षा अधिक भीती आता वन्यप्राण्यांची राहत आहे. त्यामुळे रात्रीचा थ्री फेज वीजपुरवठा बंद करून दिवस असताना देण्यात यावे, अशी मागणी सिहोरा परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.



तिवसा परिसरात वन्यप्राण्यांचा उपद्रव वाढला आहे. मानवावर हल्ले सुरू झाले आहेत.

रानडुक्कराच्या कळपाने आतंक माजविला आहे. त्यातही रात्री १२ वाजता थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येत असल्याने शेतकरी कृषीपंप सुरू करताना धास्तावला जात आहे. शेतकऱ्यांना १४ तास थ्री फेज वीजपुरवठा करून दिवसा पुरवठा सुरू करण्यात यावा. त्यामुळे शेतकऱ्यांची सुरक्षितता वाढेल.

**कैलास वाघमारे शेतकरी**